सामना

# माती परीक्षणानुसारच द्राक्ष बागांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन होणे गरजेचे

इंदापूर, दि. १२ (सा. वा.) – द्राक्ष बागायतदार बंधूंनी माती परीक्षण करून द्राक्ष बागांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन करण्याचे आवाहन राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रमुख मृदा शास्त्रज्ञ डॉ. अजय उपाध्याय यांनी उपस्थित द्राक्ष बागायतदारांना केले.

सुरवड येथे चंद्रकांत साळुंखे यांच्या शेतावर मृदा आरोग्य कार्ड वाटपप्रसंगी ते बोलत होते. महात्मा फुले कृषी विज्ञान केंद्राचे राजेंद्र वाघमोडे, मनोज मोरे, चंद्रकांत साळंखे. साहेबराव मदने. उमेश घोगरे, सतीश देवकाते, उत्तम भोंग, बाळासाहेब नरुटे याप्रसंगी उपस्थित होते.

राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र गेल्या पाच वर्षांपासून इंदापूर तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांसाठी मोफत मृदा आरोग्य कार्ड बनवून देते. माती परीक्षणामुळे बागायतदारांना योग्य खत व्यवस्थापन करता येते. अचूक खत व्यवस्थापनामुळे बागायतदारांच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत होत असते.

Pune Edition
Sep 13, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

सकाळ



सुरवड (ता. इंदापूर) : द्राक्ष बागायतदार यांना मृदा आरोग्य कार्डच्या वाटपप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# द्राक्ष बागांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन गरजेचे : डॉ. अजय उपाध्याय

इंदापूर : 'द्राक्ष बागायतदार बंधूंनी माती परीक्षण करून बागांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे,' असे मत राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रमुख मृदा शास्त्रज्ञ डॉ. अजय उपाध्याय यांनी केले. सुरवड (ता. इंदापूर) येथे सोमवारी (ता.११) चंद्रकांत साळुंखे यांचे शेतावर मृदा आरोग्य कार्ड वाटप प्रसंगी द्राक्ष बागायतदार यांना मार्गदर्शन करताना उपाध्याय बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र गेल्या पाच वर्षांपासून इंदापूर तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांसाठी मोफत मृदा आरोग्य कार्ड बनवून देते. माती परीक्षणामुळे बागायतदारांना योग्य खत व्यवस्थापन करता येते. अचूक खत व्यवस्थापनामुळे बागायतदारांच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत होत असते. चुनखडीचे प्रमाण जास्त असेल तर मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेवर मोठा परिणाम होतो म्हणून चुनखडी असणाऱ्या जमिनीच्या सुधारणेसाठी त्यांनी सल्फर (गंधक) वापरण्याची शिफारस बागायतदारांना केली. या वेळी महात्मा फुले कृषी विज्ञान केंद्राचे राजेंद्र वाघमोडे, मनोज मोरे, चंद्रकांत साळुंखे, साहेबराव मदने, उमेश घोगरे, सतीश देवकाते, उत्तम भोंग, बाळासाहेब नरुटे, धनाजी गोफणे, दत्तू कांबळे, किरण बंडगर यांच्यासह अन्य द्राक्ष बागायतदार उपस्थित होते.

लोकमत



सुरवड येथे चंद्रकांत साळुंखे यांच्या शेतावर मृदा आरोग्य कार्ड वाटप करण्यात आले.

# द्राक्षबागांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन गरजेचे : डॉ. अजय उपाध्याय

## सुरवड येथे शेतकऱ्यांना शेतावर मृदा आरोग्य कार्डचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

बावडा : द्राक्ष बागायतदार बंधूंनी माती परीक्षण करून द्राक्षबागांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे, असे आवाहन राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रमुख मृदा शास्त्रज्ञ डॉ. अजय उपाध्याय यांनी केले.

सुरवड येथे चंद्रकांत साळुंखे यांचे शेतावर मृदा आरोग्य कार्ड वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र गेल्या पाच वर्षांपासून इंदापूर तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांसाठी मोफत मृदा आरोग्य कार्ड बनवून देते. माती परीक्षणामुळे बागायतदारांना योग्य खत व्यवस्थापन करता येते. अचूक खत व्यवस्थापनामुळे बागायतदारांच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत होत असते. मातीतील अन्नद्रव्यांच्या पृथकरणामुळे उपलब्ध अन्नद्रव्य प्रमाणांचा अंदाज घेता येतो. त्यानुसार द्राक्ष बागेला संतुलित अन्नद्रव्याचा पुरवठा करता येतो. याशिवाय जमिनीचा सामू, क्षारांचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब, मुक्त चुनखडीचे प्रमाण इत्यादी गुणधर्मही तपासले जातात.

इंदापूर भागातील द्राक्षबागा या जास्त मुक्त चुनखडी असलेल्या जमिनीमध्ये घेतल्या आहेत. चुनखडीचे प्रमाण जास्त असल्यास मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेवर मोठा परिणाम होतो. म्हणून चुनखडी असणाऱ्या जमिनीच्या सुधारणेसाठी त्यांनी सल्फर (गंधक) वापरण्याची शिफारस बागायतदारांना केली.

महात्मा फुले कृषी विज्ञान केंद्राचे राजेंद्र वाघमोडे यांनी दोन वर्षांतून एकदा तरी आपल्या द्राक्षबागेतील माती परीक्षण करणे गरज व्यक्त केली.

या कार्यक्रमास मनोज मोरे, चंद्रकांत साळुंखे, साहेबराव मदने, उमेश घोगरे, सतीश देवकाते, उत्तम भोंग, बाळासाहेब नरुटे, धनाजी गोफणे, दत्तू कांबळे, किरण बंडगर आदी द्राक्ष बागायतदार उपस्थित होते.

पुढारी

# द्राक्षबागांचे खत व्यवस्थापन करा

**बावडा : पुढारी वृत्तसेवा**

मातीतील अन्नद्रव्यांच्या पृथक्करणामुळे उपलब्ध अन्नद्रव्याचा अंदाज येतो. त्यामुळे द्राक्षबागांचे माती परीक्षणानुसारच खत व्यवस्थापन करावे, असे आवाहन राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रमुख मृदाशास्त्रज्ञ डॉ. अजय उपाध्याय यांनी सोमवारी (दि. ११) केले.

सुरवड येथे मृदा आरोग्य कार्ड वाटप प्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र गेल्या पाच वर्षांपासून इंदापूर तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांसाठी मोफत मृदा आरोग्य कार्ड बनवून देत आहे. माती परीक्षणामुळे द्राक्षबागेला संतुलित अन्नद्रव्याचा पुरवठा करता येतो.



सुरवड येथे शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्डचे वाटप करण्यात आले.

त्यामुळे बागायतदारांना अचूक खत व्यवस्थापन करता येते. परिणामी, द्राक्ष बागायतदारांच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे. या प्रसंगी इंदापूर येथील महात्मा फुले कृषी विज्ञान केंद्राचे राजेंद्र वाघमोडे यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी चंद्रकांत साळुंखे, मनोज मोरे, उमेश घोगरे, साहेबराव मदने, सतीश देवकाते, उत्तम भोंग, बाळासाहेब नरुटे, धनाजी गोफणे, दत्तू कांबळे, किरण बंडगर उपस्थित होते.

**डॉ. अजय उपाध्याय यांचे आवाहन**

My Gramin Edition
Sep 16, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in